# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 March 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर;देशभरात सात टप्प्यात मतदान;चार जूनला मतमोजणी
- महाराष्ट्रात १९ एप्रिल ते २० मे पर्यंत पाच टप्प्यात निवडणूक तर मराठवाड्यात २६ एप्रिल, सात मे आणि १३ मे रोजी मतदान
- काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा मुंबईत दाखल

आणि

- मराठवाडा साहित्य परिषदेचा नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्यपुरस्कार मुंबईचे नाट्यकर्मी राजीव नाईक यांना जाहीर

****

लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, देशभरात सात टप्प्यात निवडणूक होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला लोकसभेच्या एकशे दोन जागांसाठी मतदान होणार असून, २६ एप्रिल रोजी ८९ जागांसाठी, सात मे रोजी ९४, १३ मे रोजी ९६, २० मे रोजी ४९, २५ मे रोजी ५७ तर एक जून रोजी ५७ जागांसाठी मतदान होणार आहे. मतमोजणी चार जून रोजी होणार आहे.

महाराष्ट्रात पाच टप्प्यात तर मराठवाड्यात तीन टप्प्यात मतदान होणार आहे. पहिला टप्प्यात १९ एप्रिल रोजी रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर इथं मतदान होणार असून, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, आणि

परभणी इथं मतदान होईल. तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, आणि हातकणंगले इथं मतदान होणार असून, चौथा टप्प्यात १३ मे रोजी नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, आणि बीड इथं मतदान होईल. पाचव्या टप्प्यात २० मे रोजी धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघात मतदान होणार आहे.

दरम्यान, निवडणूक आयुक्तांनी देशभरातल्या मतदारांचा तसंच मतदानासाठीच्या विविध सुविधांचा यावेळी आढावा घेतला. देशभरात एकूण ९७ कोटी मतदार असून, त्यापैकी एक कोटी ८२ लाख नवमतदार आहेत. या मतदारांना देशभरातल्या साडे दहा लाख मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. ८५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे मतदार तसंच दिव्यांग मतदारांना आपल्या घरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

राजकीय पक्षांसाठी नियमावली आयोगानं जाहीर केली. निवडणूक प्रचारात आदर्श आचारसंहितेचं पालन सर्वांना करावं लागणार असून, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पक्षाने उमेदवारी का दिली, याचा खुलासा करावा लागणार आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रलोभनांच्या वाटपावर तपास यंत्रणांना काटेकोर नजर ठेवण्यास सांगण्यात आलं आहे.

दरम्यान, सिक्कीम, ओडिशा, आंध्रप्रदेश, आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीचीही आयोगानं आज घोषणा केली. महाराष्ट्रातल्या अकोला पश्चिमसह अनेक राज्यातल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकाही आयोगाने जाहीर केल्या. संबंधित मतदार संघात लोकसभेच्या मतदानासोबतच विधानसभेचं तसंच पोटनिवडणुकीसाठीचं मतदान होणार आहे.

****

कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या मराठा नागरिकांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देताना, सगे सोयऱ्यांना या आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारनं अधिसूचना काढलेली आहे. यावर आलेल्या हरकतींची छाननी करुन अंदाजे ४ महिन्यात अंतिम निर्णय घेऊ असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केलं. राज्य मंत्रिमंडळाची या आठवड्यातील तिसरी बैठक आज मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली झाली त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत

देखील जनहिताचे अनेक निर्णय घेतले असून त्यामध्ये कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर पद्धतीने लाभ देण्यासाठी ४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

दरम्यान, आज झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या एकूण सतरा प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. सरकारी मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास आणि दंडाची रक्कम वाढवणं, गुन्ह्यांची वेगाने उकल करण्यासाठी संगणकीय न्याय सहाय्यक विज्ञान उत्कृष्टता केंद्र उभारणे तसेच राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करणे हे निर्णय बैठकीत घेण्यात आले. तसंच विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणं, वृद्ध साहित्यिक, कलाकारांना ५ हजार रुपयांचं मानधन, संस्कृत, तेलुगू, बंगाली साहित्य अकादमींची स्थापना, शासकीय, निमशासकीय जागांवर मोफत चित्रीकरण आणि हाताने मैला उचलण्याच्या प्रथेच्या उच्चाटनासाठी रोबोटिक स्वच्छता यंत्रे असलेली "मॅनहोलकडून मशीनहोल" कडे योजनेला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

दिव्यांगाना स्वावलंबी बनविण्यासाठी मोबाईल शॉप ऑन व्हेईकल अंतर्गत पर्यावरणस्नेही वाहनं उपलब्ध करून देण्याच्या योजनेचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज मुंबईत शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील अन्य मंत्री उपस्थित होते. चार दिव्यांग व्यक्तिंना हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या दुकानांच्या चाव्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आल्या. प्रत्येक जिल्हयातील दिव्यांगजनांमधून लोकसंख्येच्या प्रमाणात संपूर्ण पारदर्शक प्रक्रिया राबवून लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

****

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज दुपारी मुंबईत दाखल झाली. मुलुंड इथल्या भांडूप चौकातून राहुल गांधी यांच्या यात्रेच्या मुंबईतील प्रवासाला सुरूवात झाली असून प्रियांका गांधी देखील या यात्रेत सहभागी झाल्या आहेत. मुलूंड, धारावी, माटुंगा मार्गे ही यात्रा दादर इथं चैत्यभूमीवर पोहोचणार आहे. चैत्यभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात या यात्रेचा

समारोप होणार आहे. उद्या रविवारी मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदान अशी ही न्याय सँकल्प पदयात्रा काढण्यात येणार आहे.

दरम्यान, काँग्रेस पक्षाचे जनसंपर्क प्रभारी जयराम रमेश यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. निवडणूक रोख्यांच्या मुद्यावरून त्यांनी भारतीय जनता पक्षावर कडाडून टीका केली.

****

प्रसार भारतीचे अध्यक्ष म्हणून नवनीत कुमार सेहगल यांची नियुक्ती करण्यात आली असून, आज त्यांनी पदभार स्वीकारला. सेहगल हे निवृत्त प्रशासकीय अधिकारी आहेत. तीन वर्षांसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

प्रसिध्द गायिका अनुराधा पौडवाल यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पक्षाचे महासचिव अरुण सिंह यांच्या उपस्थितीत पौडवाल यांनी नवी दिल्ली इथं भारतीय जनता पक्षाचं सदस्यत्व स्वीकारलं.

****

नागपुरातील दिव्यांगांना आज सौरऊर्जाचलित अत्याधुनिक तीन चाकी सायकल वितरित करण्यात आल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी आज हा कार्यक्रम पार पडला. सौरऊर्जेवर ५ तासांमध्ये पूर्णपणे चार्ज होणाऱ्या या तीन चाकी सायकलचा वेग ताशी २३ किलोमीटरपर्यंत आहे. एका वेळी पूर्ण चार्ज झाल्यावर ती ४० किलोमीटर चालू शकेल. सौरऊर्जेशिवाय ही सायकल वीजेवरही चार्ज करता येणार आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेचा नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्यपुरस्कार मुंबईचे नाट्यकर्मी आणि दिग्दर्शक राजीव नाईक यांना जाहीर झाला आहे. तर यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय पुरस्कार पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ.माधव गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ असं या पुरकाराचं स्वरुप आहे. मसापच्या वतीनं जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात ही माहिती देण्यात आली.

****

ज्येष्ठ साहित्यिक दिवंगत नरहर कुरुंदकर यांच्या नांदेड इथं उभारल्या जाणाऱ्या स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामासाठी राज्य सरकारनं १४ कोटी ७८ लाख

रूपये मंजूर केले आहेत. याबाबतचा शासननिर्णय आज जारी करण्यात आला. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी यासाठी पाठपुरावा केला होता.

****

परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा पंचवीसावा दीक्षांत समारंभ कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली येत्या मंगळवारी १९ मार्चला होणार आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. विविध विद्याशाखेतील एकूण ११ हजार दोन स्नातकांना यावेळी पदवी प्रदान करण्यात येईल.

****

हिंगोली–मुंबई जनशताब्दी एक्सप्रेसचं आरक्षित तिकीट हिंगोली इथं पहाटे सव्वा चार वाजेपर्यंत देण्याचा निर्णय दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने घेतला आहे. सामान्य वेळेत सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेनंतर हिंगोली रेल्वेस्थानकावरच्या फलाट क्रमांक दोन वरील तिकीट खिडकीतून मध्यरात्री १२ वाजेपासून ते पहाटे सव्वा चार वाजेपर्यंत या गाडीचं आरक्षित तिकीट प्रवाशांना घेत येणार आहे.

****